ePaper

# शरद पवार गटाला राज्य निवडणूक आयोगाकडून मोठा दिलासा

| वर्ष - 8 | अंक - 15 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- भारताची विजयी सलामी!
- टीम इंडियाच्या निवडीवर शशी थरूर संतापले
- लंकेच्या निवडीला विखेंकडून आव्हान
- शिवरायांच्या पराक्रमाचा अपमान!


www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 20 जुलै 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या संबंधित

# पिंपरीतील कंपनीला सील ठोकले!

### पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने कारवाई

**। पिंपरी । महाईन्यूज**

**तळवडे येथील खेडकर कुटुंबाशी संबंधित असलेली आणि पालिकेचा कर थकविल्याबद्दल वादग्रस्त कंपनी थर्मोव्हेरिटा प्रायव्हटे लिमिटेडला पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने सील ठोकले आहे.**



तळवडे येथील खेडकर कुटुंबाशी संबंधित असलेली आणि पालिकेचा कर थकविल्याबद्दल वादग्रस्त कंपनी थर्मोव्हेरिटा प्रायव्हटे लिमिटेडला महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने सील ठोकले आहे. या कंपनी संचालकाकडे महापालिकेच्या दोन लाख ७७ हजार रुपयांच्या कराची थकबाकी आहे.

तळवडे गावठाण, ज्योतिबानगर येथे थर्मोव्हेरिटा प्रायव्हटे लिमिटेड ही कंपनी आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांच्या कुटुंबाशी निगडीत आहे. त्यामुळे कंपनी वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. कंपनी म. दि. खेडकर यांच्या नावे आहे. महापालिकेने यासंदर्भातली सर्व कागदपत्रे तपासली आहेत. कंपनीमार्फत २००९ पासून व्यावसायिक कर भरला जात होता. शेवटचा कर २०२२ मध्ये भरण्यात आला. त्यानंतर कर भरला नाही. कंपनीने दोन लाख ७७ हजार ७८१ रुपयांचा कर थकविला आहे. त्यामुळे नियमानुसार मालमत्ता जप्त करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

### यांनी केली कारवाई....



ही कारवाई महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने करण्यात आली. कारवाईवेळी प्रशासन अधिकारी नाना मोरे, एल. एम काळे संबंधित गटलिपिक, एमएसएफ जवान उपस्थित होते.

---

## अजित गव्हाणेंची ‘एन्ट्री’ अन् राष्ट्रवादीत अंतर्गत कलहाची ‘तुतारी’

### भाजपाच्या माजी नगरसेविका सीमा सावळेंच्या प्रवेशाचा दावा

### पिंपरी विधानसभेतील सुलक्षणा शिलवंत यांचे तिकीट धोक्यात

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाला सुरुंग लावल्यानंतर अजित गव्हाणे यांनी आता भाजपातील नाराज माजी नगरसेवकांची मोट बांधण्याची तयारी सुरू केली आहे. स्थायी समितीच्या माजी सभापती सीमा सावळे यांचे नाव यामध्ये आघाडीवर आहे. तसे, जाहीरपणे गव्हाणे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. त्यामुळे खळबळ उडाली असून, पिंपरी विधानसभा मतदार संघाची राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे आहेत.

माजी नगरसेविका सीमा सावळे या पिंपरी विधानसभेतून तीव्र इच्छुक आहेत. २०१७ मध्ये तत्कालीन एकत्र राष्ट्रवादीच्या कर्दनकाळ म्हणून त्यांचे पाहिले जाते. भ्रष्टाचाराच्या मुद्यावर त्यांनी राष्ट्रवादीला सळो की पळो करुन सोडले होते. यासह स्थानिक गाववाले नेत्यांना थेट भिडण्याची क्षमता असलेल्या सावळे यांनी आता पिंपरीतून ‘विकासाला हवा चेहरा नवा’ असा निर्धार केला आहे.

अजित गव्हाणे यांच्या समर्थक म्हणून आता सावळे राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेशकर्त्या होत आहेत.






त्यामुळे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून म्हणजेच, महाविकास आघाडीकडून तिकिटाचे ‘कन्फर्मेशन’ झाल्याशिवाय सावळे एव्हढा मोठा निर्णय घेतील, असे वाटत नाही. त्यामुळे ज्याअर्थी गव्हाणे छातीठोकपणे सांगतात की, सीमा सावळे प्रवेश करतील. त्यामुळे शरद पवार गटाच्या इच्छुक माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत धर यांना तिकिटावर पाणी सोडावे लागण्याची दाट शक्यता आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या दमदार यशानंतर शरद पवार यांच्या उपस्थितीमध्ये पिंपरी-चिंचवडमध्ये शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्या पुढाकाराने विजयी संकल्प मेळावा होत आहे.

### ‘आयातांना’ उमेदवारी अन् निष्ठावंतांच्या हातावर तुरी...

निष्ठावंत आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या जोरावर राष्ट्रवादी शरद पवार गटाने लोकसभा निवडणुकीत दैदीप्यमान यश मिळवले आहे. आता ‘संधीसाधु’ लोकांना पक्षात घेवू नका आणि घेतलेच तर उमेदवारी देवू नका... असा सूर सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा आहे. याबाबत पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मशुद्धीकरणाच्या इतिहासाचा दाखला देत “मी सामान्य कार्यकर्त्याच्या भूमिकेशी सहमत आहे”, असे म्हटले होते. त्यामुळे अजित गव्हाणे ज्यावेळी पुण्यात प्रवेशकर्ते झाले. त्यावेळी खासदार कोल्हे यांची अनुपस्थिती राजकीय संकेत देणारी आहे. आता पिंपरी मतदार संघातून सीमा सावळे यांचे नाव निश्चित झाले, तर सुलक्षणा शिलवंत धर यांचा पत्ता कट होणार आहे. ज्या काळात पक्षाला शहराध्यक्ष अथवा चेहरा नव्हता. त्यावेळी माजी नगरसेवक तुषार कामठे आणि सुलक्षणा शिलवंत यांनी ‘रिस्क’ घेतली. विचारांच्या मुद्यावर ही मंडळी शरद पवार साहेबांसोबत राहीली, आता निवडणुकीच्या चढाओढीत ‘आयातांना’ उमेदवारी अन् निष्ठावंतांच्या हातावर तुरी... देण्याची भूमिका पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार घेणार आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# वडीलांचं नाव बदलून दिली परीक्षा

## » प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांचा पाय आणखी खोलात

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी यांचा पाय आणखी खोलात गेला आहे. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात नियमबाह्य पद्धतीने वागल्यानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगाने त्यांची चौकशी सुरू केली होती. याआधी त्यांनी ओबीसी नॉनक्रिमिलेयर आणि अंशतः अंपगत्वाचे बोगस प्रमाणपत्र वापरल्याचा आरोप झाला .**



आता यूपीएससीने चौकशी केल्यानंतर एक पत्रक जाहीर केले आहे. त्यात अनेक गंभीर आरोप असल्याचे समोर आले आहे. तसेच या आरोपानंतर तुमची नागरी सेवा परीक्षा – २०२२ ची उमेदवारी का रद्द करू नये? अशी कारणे दाखवा नोटीसही केंद्रीय लोकसेवा आयोगाने दिली आहे. पूजा खेडकर यांनी आपला फोटो, स्वाक्षरी, ईमेल आयडी, मोबाइल नंबर, स्वतःचे आणि आई-वडिलांचे नाव बदलून नियमापेक्षा अधिक वेळा परीक्षा दिल्याचा आरोप करण्यात येत आहे.पूजा खेडकर यांनी आपली ओळख बदलून नियमापेक्षा अधिकवेळा परीक्षा दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. हे करण्यासाठी त्यांनी स्वतःचा फोटो, स्वाक्षरी, नाव, आई-वडिलांचे नाव, ईमेल आयडी, मोबाइल नंबर आणि पत्ता बदलला. यूपीएससीची परीक्षा किती वेळा द्यावी, याचे प्रत्येक प्रवर्गाचे नियम ठरलेले आहेत. परीक्षा देण्याची मर्यादा संपल्यानंतर कोणत्याही उमेदवाराला पुन्हा यूपीएससीची परीक्षा देता येत नाही. मात्र पूजा खेडकर यांनी ओळख बदलून परीक्षा दिली.पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रकरणानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगाने पूजा खेडकर यांच्या प्रकरणाचा सखोल तपास केला. नागरी सेवा परीक्षा – २०२२ मधून पूजा खेडकर यांची निवड झाली होती. या तपासातून समोर आले की, पूजा खेडकर यांनी नावे बदलून अनेकवेळा यूपीएससीची परीक्षा दिली. प्रत्येक प्रवर्गासाठी परीक्षा कितीवेळा द्यावी, याची नियमावली आखून दिलेली आहे. पूजा खेडकर यांनी स्वतःचे, कधी वडील आणि आईचे नाव बदलून, तसेच स्वतःचा फोटो, स्वाक्षरी, ईमेल आयडी आणि फोन नंबर बदलून अनेकवेळा यूपीएससीची परीक्षा दिली, असे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पत्रकात म्हटले आहे.केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नोंदीनुसार पूजा खेडकर यांनी ओबीसी प्रवर्गातून नागरी सेवा परीक्षा – २०२२ मध्ये देशभरातून ८२१ क्रमांक मिळविला होता. ११ जुलै रोजी केंद्राने पूजा खेडकर यांच्या ओबीसी नॉनक्रिमीलेयर आणि अंपगत्वाच्या प्रमाणपत्राबद्दल चौकशी करण्यासाठी कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाचे अतिरिक्त सचिव मनोज कुमार द्वीवेदी यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती स्थापन केली होती.

### प्रकरण कसे समोर आले?

प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षणार्थी म्हणून कामकाज सुरू केल्यानंतर विशेष दालन, सरकारी निवासस्थान आणि वाहनाची मागणी केली. तसेच स्वतःच्या खासगी आलिशान वाहनाला अंबर दिवा लावला. खासगी वाहनावर अशाप्रकारे अंबर दिवा लावता येत नाही. तसेच वरीष्ठ अधिकाऱ्यांचा कक्ष ताब्यात घेतल्यामुळे त्यांच्याविरोधात नाराजी पसरली. पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी याची मुख्य आयुक्तांकडे तक्रार केल्यानंतर हे प्रकरण उजेडात आले.

# मनसेकडून मला जीवे मारण्याची धमकी

## » वसंत मोरे : मनसेचे कार्यकर्ते माझा खून करण्यापर्यंत गेले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनेच्या ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. ही धमकी मनसेच्या कार्यकर्त्याने दिल्याचा आरोप वसंत मोरे यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी पोलिसांत तक्रारदेखील केली आहे. दरम्यान, या तक्रारीनंतर वसंत मोरे यांनी आता मनसेच्या नेत्यावर गंभीर आरोप केले आहे.**



मनसेच्या कार्यकर्त्याने मला जीवे मारण्याची धमकी दिली, असा गंभीर आरोप शिवसेनेच्या ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे यांनी केला आहे. एक्स या सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. तसेच त्यांनी मोबाईल संभाषणाची एक ऑडिओ क्लिपदेखील शेअर केली आहे. हे संभाषण मनसे कार्यकर्ता तसेच वसंत मोरे यांचा भाचा प्रतिक कोडितकर यांच्यातील असल्याचे सांगण्यात येत आहे.टीव्ही ९ वृत्तावाहिनीशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे.मी उद्धव ठाकरेंची भेट घेऊन ठाकरे गटात प्रवेश केला तेव्हापासून मला धमकीचे फोन येत आहेत. हा फोन मला १५ दिवसांपूर्वी आला होता. या व्यक्तीने मला तीन ते चार वेगवेगळ्या नंबरवरून फोन केले होते. फोन केल्यानंतर तो मला थेट शिवीगाळ करत होता. तसेच मी मनसेचा कार्यकर्ता आहे, असं सांगत होता. त्यावेळी मी माझा भाचा प्रतिकला फोन करून याची माहिती दिली. त्याने त्या व्यक्तीला फोन केला तेव्हा त्यालाही शिवीगाळ करण्यात आली", असं वसंत मोरे यांनी सांगितले.सुरुवातीला आम्ही हा प्रकाराकडे दुर्लक्ष केलं. याबाबत तक्रार केली नाही. मात्र, त्यानंतर हा प्रकार वाढत गेला. माझ्या सोशल मीडिया खात्यावरही अशाप्रकारे धमक्या मिळत होत्या. ज्यादिवशी मी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. त्यादिवशी सुद्धा माझ्या मुलाला आणि इतर काही कार्यकर्त्यांना धमकीचे फोन आले. त्यांना शिवीगाळ करण्यात आली, एकंदरिताच माझा ठाकरे गटातील प्रवेश रोखण्यासाठी ही योजना होती, हे माझ्या लक्षात आलं", असंही वसंत मोरे म्हणाले. पुढे बोलताना त्यांनी मनसेचे नेते साईनाथ बाबर यांच्यावर गंभीर आरोपही केले. "या धमकी प्रकरणी आम्ही पोलिसांत तक्रार दाखल आली आहे. पण माझा पूर्ण विश्वास आहे की, यामागे मनसे शहर अध्यक्ष साईनाथ बाबर आहेत", असे ते म्हणाले.

### पोस्ट करत दिली होती माहिती

तत्पूर्वी वसंत मोरे यांनी एक्स या सोशल मीडियावर पोस्ट करत यासंदर्भात माहिती दिली होती. "मी पुन्हा माझ्या जुन्या पक्षात गेलो, तर असा कोणता गुन्हा केला की मनसेचे कार्यकर्ते माझा खून करण्यापर्यंत गेले?" असं वसंत मोरे म्हणाले होते. तसेच याप्रकरणी संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यासाठी मागणी करत भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्याचेही वसंत मोरे यांनी सांगितले होतं.

## ‘हॉटेल व्यावसायिकांनी एका महिन्याच्या आत

# व्यवसाय इमारतींचे ‘स्ट्रक्चरल ऑडिट’ करावे!

### आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी हॉटेल व्यावसायिकांना दिल्या सूचना

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका हद्दीतील हॉटेल व्यावसायिकांनी एका महिन्याच्या आत व्यवसाय इमारतीचे ‘स्ट्रक्चरल ऑडिट’ करावे. तसेच महापालिकेकडून व्यवसाय अग्निसुरक्षा प्रमाणपत्र आणि विद्युत सुरक्षा ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे, अशा सूचना आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी हॉटेल व्यावसायिकांना दिल्या. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील आयुक्त यांच्या दालनात हॉटेल व्यावसायिक संघटनांसमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.**



बैठकीच्या अध्यक्षस्थानी आयुक्त शेखर सिंह होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, उप आयुक्त मनोज लोणकर, संदीप खोत, अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता हरविंदर सिंग बन्सल, अग्निशमन अधिकारी ऋषिकेश चिपाडे यांच्यासह विविध हॉटेल संघटनाचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी हॉटेल्स च्या ठीकाणी करावयाच्या अग्निशामक यंत्रणेविषयी सविस्तर माहिती उप आयुक्त मनोज लोणकर यांनी दिली.

शहरात सर्वत्र हॉटेल, रेस्टॉरंट, बार आणि इतर व्यावसायिक इमारतींची संख्या मोठी आहे. याठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरिक वावरत असतात. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शहरातील सर्व हॉटेल्स, बार, रेस्टॉरंट तसेच इतर व्यावसायिक इमारतींचे संबंधित व्यवसाय मालकांनी एका महिन्याच्या आत ‘स्ट्रक्चरल ऑडिट’ करून घ्यावे. तसेच महापालिकेकडून व्यवसाय अग्निसुरक्षा प्रमाणपत्र, विद्युत सुरक्षा ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे, असे आयुक्त शेखर सिंह म्हणाले.

### दोषींवर कठोर कारवाई करण्यात येणार

महापालिकेच्या वतीने येत्या काही दिवसात शहरातील सर्व हॉटेल्स, बार, रेस्टॉरंट, हॉस्पिटल तसेच व्यावसायिक इमारतींचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. सर्वेक्षणात दोषी आढळलेल्या आस्थापनांवर महापालिकेच्या वतीने कठोर कारवाई करण्यात येणार आहे, तसेच हॉटेल्स, बार, रेस्टॉरंट येथे बेकायदेशीर व्यवसाय चालू असल्यास त्यांच्या सर्व परवानग्या रद्द करण्यात येतील, असेही ते म्हणाले.

---

# शिवाजीवाडी-मोशी रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी!

### अंशूल ईला, ऋषभ व्हिला सोसायटीला हक्काचा रस्ता; 500 सदनिकाधारकांना दिलासा

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवाजीवाडी-मोशी रस्त्याची दुरावस्था झाली होती. त्यामुळे सदनिकाधारक आणि स्थानिक नागरिकांना मन:स्ताप सहन करावा लागत होता. त्यामुळे नागरिकांच्या मागणीनुसार, सदर कामाला तात्काळ सुरूवात करण्यात आली. त्यामुळे सुमारे ५०० सदनिकाधारकांना दिलासा मिळाला आहे.**





भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या शिवाजीवाडी-मोशी रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रा. राजेश सस्ते, अर्चना सस्ते, सुदाम तारसे, गणेश सस्ते, वंदना आल्हाट, विभद्र निरने, अजित सस्ते, सचिन सस्ते, राहुल सस्ते तसेच, चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, ऋषभ व्हिला सोसायटीचे चेअरमन व सदस्य उपस्थित होते.

शिवाजीवाडी, मोशी येथे अंशूल ईला सोसायटी, ऋषभ विला सोसायटी आणि राधाकृष्णनगर येथील रस्त्यांच्या कामांसाठी स्थानिक नागरिकांनी मागणी केली होती. त्यानुसार, सदर रस्त्याच्या कामाला सुरूवात करण्यात आली. याबाबत सोसायटीधारकांनी आमदार लांडगे यांचे आभार मानले आहेत.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका १९९७ मध्ये हद्द वाढ करण्यात आली. समाविष्ट गावांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा विकसित करण्यासाठी २०१७ पर्यंत प्रतीक्षा करावी लागली. भारतीय जनता पार्टीच्या सत्ताकाळात समाविष्ट गावांच्या विकासाला चालना देण्यात आली. त्यामुळे ‘चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर’ विकसित झाला. नागरीकरण वाढले. त्यामुळे वाडी-वस्तीवरील अंतर्गत रस्त्यांची कामे मार्गी लावण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे.

> “भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये सोसाटीधारक पिंपरी-चिंचवडकरांना पायाभूत सोयी-सुविधा सक्षमपणे देण्याबाबत आम्ही सकारात्मक भूमिकेतून सातत्त्यपूर्ण पाठपुरावा करीत आहोत. रस्ते, पाणी, वीज पुरवठा आणि कचरा अशा नागरी समस्या सोडवण्यासाठी नागरिकांनी ‘परिवर्तन हेल्पलाईन- 93 79 90 90 90’ वर संपर्क करावा. सोसायटीधारकांच्या न्याय्य हक्कांसाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> **–महेश लांडगे, आमदार,**
> भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# शेतकरी 'लाडका' कधी होणार?



भूमिका

**लाडकी बहीण काय किंवा लाडका भाऊ काय, फुकटचे किंवा कोणतीही मेहनत न करता काही मिळाले की त्याची किंमत राहत नाही. सरकारकडून सध्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून फुकटच्या योजना जाहीर करणे सुरू आहे, ते अजिबात योग्य नाही. अशा फुकटच्या सवयींमुळे लोक आणखी आळशी होतील आणि आगामी काळात कोणतेही काम करण्याची इच्छा त्यांच्यात राहणार नाही.**

समाजासाठी हे घातक चित्र आहे... यापेक्षा जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव कसा मिळेल यासाठी 'शेतकरी माझा लाडका' ही योजना जाहीर करता येते का ते बघा... एकदा का शेतकऱ्याला न्याय मिळाला की त्यात मग भाऊ-बहीण, आई- बाबा, काका-काकू मामा- मावशी सर्वच आले... समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळावा, समाजातील शेवटचा घटकही मुख्य प्रवाहात सामील व्हावा यासाठी शासनाकडून काही चांगल्या योजना जाहीर होत असतील तर त्याचे स्वागतच आहे. शिक्षण, आरोग्य, निवारा यासारख्या सोयी काही लोकांना सरकारकडून मिळत असतील तर त्या मिळायलाच हव्यात. म्हणजे विकासापासून कोसो दूर आहेत किंवा वंचित आहेत अशांना मदतीचा हात मिळाला तर ते मुख्य प्रवाहात येऊन समाजासोबत स्पर्धा करू शकतील. परंतु ज्यांना काही गरज नाही अशांना मेहनती शिवाय काही मिळत असेल तर त्यामुळे समाजातील गणित बिघडल्याशिवाय राहणार नाही. शेती असो, कोणताही उद्योग धंदा असो किंवा आणखी काही काम असो सध्या काम करायला मजूर मिळत नाहीत अशी परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत पुन्हा काही फुकटच्या योजना येत असतील तर ही परिस्थिती आणखी बिकट झाल्याशिवाय राहणार नाही, यावर सर्वांनीच गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे...



महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका अवघ्या तीन महिन्यांवर आलेल्या असताना महाराष्ट्र शासनाकडून सध्या वेगवेगळ्या योजनांचा भडीमार सुरू आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर झाल्यानंतर सेतू केंद्रांवर बऱ्याच ठिकाणी चेंगराचेंगरी सारखी परिस्थिती निर्माण झाली. कागदपत्रे गोळा करण्यासाठी लोकांची झुंबड उडाली. विरोधकांनी या योजनेवर टीका करताना लाडकी बहीण झाले मग भावाचे काय असा सवाल उपस्थित केला होता. त्याला उत्तर म्हणून दोन दिवसांपूर्वीच मुख्यमंत्र्यांनी लाडका भाऊ योजना जाहीर केली. दरम्यानच्या काळात मुख्यमंत्री तीर्थाटन योजनाही जाहीर करण्यात आली. वयोवृद्ध नागरिकांना एसटी महामंडळातर्फे फुकटची योजना अगोदरच जाहीर झालेली आहे, महिलांसाठीही वेगवेगळ्या सवलती आहेत. या सर्व सवलतींचा सर्व बाजूंनी विचार केला तर यामुळे फायदा होतो की नुकसान याचा विचार करण्याची वेळ आली आहे. सर्व लोक बसने प्रवास करीत आहेत आणि काही लोकांकडे पैसे नाहीत म्हणून ते पायी चालत आहेत असे विषम चित्र समाजात कुठे दिसत असेल तर अशा लोकांना सवलत मिळायलाच हवी. पण एकीकडे लोकांची क्रयशक्ती वाढत असताना, समाजातील टू व्हीलर आणि फोर व्हीलर गाड्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असताना सरकार अशा योजना जाहीर करतेच कशासाठी हा खरा सवाल आहे. निवडणुका आल्या की लोकांना वेगवेगळ्या पद्धतीने आकर्षित करणे ठीक आहे पण त्यामुळे काम करण्याचे चक्र बिघडणार नाही याची खबरदारी राज्यकर्त्यांनी घ्यायला हवी.

असो किंवा शेती असो त्या ठिकाणी काम करायला मजूर सापडत नाहीत अशी परिस्थिती आहे. मजूर सापडले तरी शेतापर्यंत त्यांची ने आण करण्याची जबाबदारी घेण्यापासून त्यांना तासाप्रमाणे मजुरी देण्याची कसरत सध्या शेतकऱ्यांना करावी लागत आहे. अशा परिस्थितीत फुकटच्या शालेय पोषण आहारापासून, फुकटचे गणवेश, फुकटची पुस्तके, सरकारच्या विविध योजनांपासून मिळणारे फुकटचे लाभ, रेशनचे मिळणारे अतिरिक्त धान्य, त्यातून होणारा काळाबाजार आणि वरून लाडके भाऊ आणि लाडक्या बहिणीसारख्या काम नसणाऱ्या योजना राबविल्याने समाजात सध्या काम न करता पोट भरू शकते ही मानसिकता वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## प्रासंगिक »

### जम्मूचे नवे काश्मीर!

***'अनुच्छेद ३७०' रद्द केल्यानंतर सगळे कसे सुरळीत आहे असे दावे आणि त्यातला तद्दन फोलपणा इतकाच विचार करून चालणार नाही.***

जम्मू-काश्मिरातील घटना अनेक कारणांसाठी चिंता वाढवणाऱ्या आहेत. या राज्यातील दहशतवादास आळा घालण्यास केंद्र सरकारला सातत्याने येणारे अपयश हा एकच मुद्दा या संदर्भात विचारात घेऊन चालणार नाही. तसेच या प्रदेशास लागू 'अनुच्छेद ३७०' रद्द केल्यानंतर सर्व काही सुरळीत कसे आहे असे केले जाणारे दावे आणि त्यांतील तद्दन फोलपणा इतकाच विचार करून चालणारे नाही. हे मुद्दे आहेतच आहेत. पण त्यांच्या बरोबरीने जम्मू-काश्मिरातील संघर्षास अनेक नवे आयाम असून तेही विचारात घेतल्यास परिस्थिती किती गंभीर आहे हे लक्षात यावे. दहशतवाद्यांकडून सुरक्षारक्षकांना सातत्याने केले जाणारे लक्ष्य ही यातील सर्वाधिक गंभीर बाब. विशेषत: 'राष्ट्रीय रायफल्स'सारख्या लष्कराच्या अत्यंत प्रशिक्षित आणि या परिसरांतील लढाईचा अनुभव असलेल्या तुकडीतील सैनिक या हल्ल्यांत बळी जात असतील

वार्षिक नागरी सेवा परीक्षेत डॉ. पूजा खेडकर यांचा क्रमांक होता ८३६ वा. आणि तरीसुद्धा त्यांची निवड 'आयएएस' या देशातल्या प्रमुख सेवेसाठी झाली. एरवीही एकंदर नागरी सेवांच्या घसरत्या दर्जाबद्दल आपण कुरबुरी ऐकतोच, पण कमीत कमी 'आयएएस' बाबत तरी गुणसंख्येचा, क्रमांकाचा काही विधिनिषेध पाळला जात असेलच ना?

## खोटेपणा केला असेल तर 'तिला' काढून टाका

डॉ. पूजा खेडकर वंजारी समाजातील आहेत. महाराष्ट्रात प्रामुख्याने मराठवाड्यातील बीड जिल्हा पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्याचा उत्तर भाग इथे बहुसंख्येने असलेला हा समुदाय इतर मागासवर्गीय (ओबीसी) म्हणून वर्गीकृत आहे. पण मराठवाड्यातल्याच नांदेड जिल्ह्याचा किनवट तालुका आणि विदर्भात यवतमाळ जिल्हा इथे बहुसंख्येने असलेल्या 'बंजारा' या 'अनुसूचित जमाती'मध्ये वर्गीकृत असलेल्या समुदायाप्रमाणेच सवलती बंजारी समाजाला हव्या असल्याचा वाद महाराष्ट्रात गेली काही दशके जुना आहे. नुसते आकडेच पाहिले, तर सरकारी/ निमसरकारी नोकऱ्या वा शिक्षणसंस्थांत अनुसूचित जमातींसाठी (एसटी) आरक्षण अवघे साडेसात टक्के आहे. अनुसूचित जातींसाठी (एससी) साडेबारा टक्के आरक्षण आणि ओबीसींना – अर्थात मंडल आयोगाच्या अंमलबजावणीनंतर- २७ टक्के



आरक्षण. पण ओबीसींना असलेली 'नॉन-क्रीमी लेयर'ची अट अनुसूचित जाती/ जमातींच्या आरक्षणासाठी नाही! ओबीसींना आरक्षण देताना त्या समुदायांपैकी जी कुटुंबे आधीच सुखवस्तू आहेत, त्यांच्याऐवजी खऱ्या गरजूंना आरक्षण मिळावे, हे 'क्रीमी लेयर' संकल्पना लागू होण्याचे कारण. त्यात उदात्तता आहे, आदर्शवाद आहे. ओबीसींना नव्याने आरक्षण लागू करताना (१९९० च्या ऑगस्टात मंजूर झालेला हा प्रस्ताव बरेच वाद आणि कोर्टबाजीनंतर सप्टेंबर १९९२ पासून प्रत्यक्षात आला) त्याचा गैरवापर होऊ नये, यासाठी सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेले ते न्यायतत्त्व आहे.

व्यवहारात या 'क्रीमी लेयर'च्या वार्षिक कौटुंबिक उत्पन्नाची रक्कम गेल्या तीन दशकांत वाढत जाऊन, आता ती वर्षाला आठ लाख रुपयांवर स्थिरावली आहे. म्हणजे अख्ख्या कुटुंबाचे उत्पन्न वर्षाला आठ लाख रु. पेक्षा कमी असेल, तरच ओबीसींना 'नॉन- क्रीमी लेयर' म्हणून कोणत्याही सवलतींचा लाभ घेता येतो, अन्यथा नाही. पण पूजा खेडकरांचे वडील तर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळात वरिष्ठ पदावर होते. त्यांनी २०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक लढवली, त्या वेळी निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार प्रतिज्ञापत्रावर जाहीर केलेली स्वत:ची संपत्ती ४० कोटी रुपये किमतीची होती, त्यात जमिनी, बंगले आणि आलीशान मोटारींचा समावेश होता. या अशा वडिलांच्या मुलीने मात्र 'ओबीसी' समुदायासाठीचे 'नॉन क्रीमी लेयर' मिळवून भारतातील सर्वांत प्रतिष्ठेची नागरी सेवा परीक्षा दिली!

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शिवरायांच्या पराक्रमाचा अपमान!

## एकनाथ शिंदेः साताऱ्यातील ‘शिवशस्त्रशौर्यगाथा’ या प्रदर्शनाचे उद्घाटन

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लंडनच्या व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट वस्तुसंग्रहालयात असलेली वाघनखं महाराष्ट्रात आणण्यात आली आहेत. ही वाघनखं शिवाजी महाराजांची असल्याचा दावा राज्य सरकारद्वारे करण्यात आला आहे. मात्र, काही इतिहास तज्ज्ञांसह विरोधकांनी या दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. यावरूनच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला आहे.**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज साताऱ्यातील ‘शिवशस्त्रशौर्यगाथा’ या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. वाघनखांवर आक्षेप घेणं म्हणजे, शिवरायांच्या शौर्याचा आणि पराक्रमाचा अपमान आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.मी आज इथे राज्याचा मुख्यमंत्री म्हणून नाही, तर शिवरायांचा मावळा म्हणून उभा आहे. आज शेकडो मैल प्रवास करत ही वाघनखं मराठी भूमीत दाखल झाली आहेत. यासाठी सुधीर मुनगंटीवार यांनी खूप प्रयत्न केले. त्यामुळेच आपल्याला या वाघनखांचे दर्शन झाले आहे. याबद्दल मी सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानतो”, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.“काही लोक आज या वाघनखांवर शंका उपस्थित करत आहेत. हे आपलं दुर्दैवं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या वाघनखांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला, ती वाघनखं येत आहेत, हे ऐकून प्रत्येकाला अभिमान वाटला आहे. परंतू काही लोकांना फक्त राजकारण करायचं आहे. चांगल्या कामांना गालबोट लावायचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. पण वाघनखांवर आक्षेप घेणं म्हणजे, हा शिवरायांच्या शौर्याचा आणि पराक्रमाचा अपमान आहे”, अशी प्रतिक्रियाही मुख्यमंत्र्यांनी दिली.पुढे बोलताना त्यांनी विरोधकांना टोलाही लगावला, “सुधीर मुनगंटीवार यांनी आज मलाही वाघनखं भेट दिली आहेत. खरं तर मी मारलेले वरखडे अनेकदा दिसत नाहीत आणि ते बसले तर तोंड उघडून सांगता येत नाही, असे ते म्हणाले. तसेच या वाघनखांचा योग्यवेळी योग्य वापर नक्की होईल”, असा इशाराही त्यांनी विरोधकांना दिला.प्रत्येक मराठी माणसांसाठी आजचा दिवस आनंदाचा दिवस आहे. प्रत्येक मराठी मनं आज सुखावली आहेत. राज्यात आज जल्लोषाचे वातावरण आहे.

प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद दिसतो आहे. प्रत्येक जण या दिवसाची आतूरतेने वाट बघत होता. आता उद्यापासून प्रत्येक शिवप्रेमींना या वाघनखांचे दर्शन होणार आहे. खरं तर हे दर्शन या वाघनखांचं नसून शिवरायांच्या शौर्याचे आणि पराक्रमाचं होणार आहे”, असेही ते म्हणाले.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज साताऱ्यातील ‘शिवशस्त्रशौर्यगाथा’ या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. वाघनखांवर आक्षेप घेणं म्हणजे, शिवरायांच्या शौर्याचा आणि पराक्रमाचा अपमान आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.मी आज इथे राज्याचा मुख्यमंत्री म्हणून नाही, तर शिवरायांचा मावळा म्हणून उभा आहे. आज शेकडो मैल प्रवास करत ही वाघनखं मराठी भूमीत दाखल झाली आहेत. यासाठी सुधीर मुनगंटीवार यांनी खूप प्रयत्न केले. त्यामुळेच आपल्याला या वाघनखांचे दर्शन झाले आहे. याबद्दल मी सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानतो”, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.“काही लोक आज या वाघनखांवर शंका उपस्थित करत आहेत. हे आपलं दुर्दैवं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या वाघनखांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला, ती वाघनखं येत आहेत, हे ऐकून प्रत्येकाला अभिमान वाटला आहे. परंतू काही लोकांना फक्त राजकारण करायचं आहे. चांगल्या कामांना गालबोट लावायचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. पण वाघनखांवर आक्षेप घेणं म्हणजे, हा शिवरायांच्या शौर्याचा आणि पराक्रमाचा अपमान आहे”, अशी प्रतिक्रियाही मुख्यमंत्र्यांनी दिली. पुढे बोलताना त्यांनी विरोधकांना टोलाही लगावला.

### “विरोधकांना दिला इशारा”

“सुधीर मुनगंटीवार यांनी आज मलाही वाघनखं भेट दिली आहेत. खरं तर मी मारलेले वरखडे अनेकदा दिसत नाहीत आणि ते बसले तर तोंड उघडून सांगता येत नाही, असे ते म्हणाले. तसेच या वाघनखांचा योग्यवेळी योग्य वापर नक्की होईल”, असा इशाराही त्यांनी विरोधकांना दिला. प्रत्येक मराठी माणसांसाठी आजचा दिवस आनंदाचा दिवस आहे. प्रत्येक मराठी मनं आज सुखावली आहेत. राज्यात आज जल्लोषाचे वातावरण आहे. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद दिसतो आहे.

# लंकेंच्या निवडीला सुजय विखेंकडून आव्हान

## लंके यांचा निवडून आल्याचा जाहीर केलेला निर्णय रद्द करावा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून निवडून आलेले उमेदवार नीलेश लंके यांच्या निवडीला आव्हान देणारी याचिका त्यांचे प्रतिस्पर्धी महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्याकडून मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल करण्यात आली आहे. नीलेश लंके यांना निवडून आल्याचा जाहीर केलेला निर्णय रद्द करावा, अशी मागणी याचिकेतून करण्यात आली आहे.**





माजी खासदार सुजय विखे यांनी ॲड. आश्विन होन यांच्यामार्फत दाखल केलेल्या याचिकेतून काही मतदान केंद्रांवरील मोजणीवर आक्षेप घेण्यात आलेला आहे. संबंधित ४० ते ४५ केंद्रांवरील मतमोजणी योग्य पद्धतीने झालेली नाही. त्याची पडताळणी करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे रितसर शुल्क भरून फेरपडताळणीची मागणी केलेली आहे. याशिवाय निवडणुकीच्या प्रचारादरम्यान, नीलेश लंके व त्यांच्या प्रचारकांनी केलेली भाषणे विखे पाटलांची खोटी बदनामी करणारी आहेत. तसेच नीलेश लंकेंनी दाखवलेला निवडणूक खर्च आणि प्रत्यक्षातील खर्च यांचा ताळमेळ दिसून येत नाही. मुद्रित प्रचारातील साहित्याचा खर्च त्यांनी दाखवलेला नाही. परिणामी लंकेंनी दाखवलेल्या निवडणुकीतील खर्चातल्या मर्यादेचे उल्लंघन झालेले, आदी मुद्द्यांवर सुजय विखे पाटील यांनी ही याचिका दाखल केली आहे. खंडपीठाने याचिका दाखल करून घेतली आहे.

### मतमोजणी योग्य पद्धतीने झालेली नाही

काही मतदान केंद्रांवरील मोजणीवर आक्षेप घेण्यात आलेला आहे. संबंधित ४० ते ४५ केंद्रांवरील मतमोजणी योग्य पद्धतीने झालेली नाही. त्याची पडताळणी करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे रितसर शुल्क भरून फेरपडताळणीची मागणी केलेली आहे. याशिवाय निवडणुकीच्या प्रचारादरम्यान, नीलेश लंके व त्यांच्या प्रचारकांनी केलेली भाषणे विखे पाटलांची खोटी बदनामी करणारी आहेत. तसेच नीलेश लंकेंनी दाखवलेला निवडणूक खर्च आणि प्रत्यक्षातील खर्च यांचा ताळमेळ दिसून येत नाही. मुद्रित प्रचारातील साहित्याचा खर्च त्यांनी दाखवलेला नाही.

# पोलिसांवरच करावा लागला लाठीचार्ज?

## झारखंडमध्ये आंदोलक पोलिस रस्त्यावर

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**कायदा सुव्यवस्था राखण्याचे काम पोलिसांकडून केले जाते. बरेचदा आंदोलन, मोर्चा, संप अशा गोष्टी मोडित काढण्यासाठी पोलिसांकडून लाठीचार्ज, पाण्याचा फवारा वा अश्रुधूर यांचा वापर केला जातो. थोडक्यात, जमलेल्या गर्दीची पांगापांग करणे हा यामागचा उद्देश असतो. मात्र, पोलिसांनी पोलिसांवरच लाठीचार्ज केल्याची घटना तशी दुर्मिळच म्हणावी लागेल. झारखंडमध्ये आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या पोलिसांवर पोलिसांनीच लाठीचार्ज केला आहे. पीटीआयने याबाबतचे वृत्त दिले आहे.**



झारखंड राज्यातील सहायक पोलीस कर्मचारी (एसपीओ) मुख्यमंत्र्यांच्या रांची येथील निवासस्थानाबाहेर आपल्या मागण्यांसाठी निदर्शने करत होते. झारखंड पोलिसांनी पोलिसांचेच हे आंदोलन मोडून काढण्यासाठी आज शुक्रवारी (१९ जुलै) त्यांच्यावर लाठीचार्ज केला आहे. आंदोलन करणारे हे एसपीओ पोलीस सध्या कंत्राटी पद्धतीने नोकरीवर आहेत. त्यामुळे, या पोलिसांना इतर पोलिसांप्रमाणे सर्व सरकारी सेवा-सुविधा प्राप्त होत नाहीत. तसेच त्यांना वेतनही अल्प मिळते.गेल्या अनेक दिवसांपासून झारखंडमधील सहायक पोलीस कर्मचाऱ्यांकडून या मागण्या केल्या जात आहेत. पगारवाढीसह आठ मागण्या त्यांनी लावून धरल्या आहेत. मात्र, त्यांच्या कोणत्याच मागण्यांकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याने आज या पोलीसांनी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाबाहेर आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. आज आंदोलक पोलिसांनी मुख्यमंत्री निवासस्थानाला सर्व बाजूने घेरण्याचे ठरवले. त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाच्या संरक्षणासाठी लावलेले बॅरिकेड्स तोडून सुरक्षा यंत्रणा मोडण्याचा प्रयत्न केला. त्या दरम्यानच आंदोलक पोलीस आणि तैनात असलेले पोलीस यांच्यामध्ये धुमश्चक्री पहायला मिळाली. आंदोलक पोलिसांनी पोलिसांच्याच वाहनांची नासधुस केल्याचा आरोप केला जात आहे. याच दरम्यान पोलिसांनी आंदोलक पोलिसांवर लाठीचार्ज केला. या लाठीचार्जमध्ये काही जण जखमी झाले आहेत. सध्या हे आंदोलन नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत; मात्र, हे आंदोलक पोलिस रस्त्यावर ठाण मांडून बसल्याची माहिती आहे. आंदोलन करणाऱ्या पोलिसांनी मुख्यमंत्र्यांसमोर काही मागण्या ठेवल्या आहेत. आपल्याला कायमस्वरूपी नोकरी मिळावी, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. या मागणीसह विविध मागण्यांच्या पुर्ततेसाठी हे पोलीस मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाबाहेर निदर्शने करत आहेत. पगारवाढ आणि नोकरीवर नियमित करण्याच्या मागणीसाठी या सहायक पोलिस कर्मचाऱ्यांनी रांचीमध्ये आंदोलन केले आहे. त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांनी त्यांच्यावर लाठीचार्ज केला. कायदा सुव्यवस्था राखण्याचे काम पोलिसांकडून केले जाते. बरेचदा आंदोलन, मोर्चा, संप अशा गोष्टी मोडित काढण्यासाठी पोलिसांकडून लाठीचार्ज, पाण्याचा फवारा वा अश्रुधूर यांचा वापर केला जातो. थोडक्यात, जमलेल्या गर्दीची पांगापांग करणे हा यामागचा उद्देश असतो. मात्र, पोलिसांनी पोलिसांवरच लाठीचार्ज केल्याची घटना तशी दुर्मिळच म्हणावी लागेल. झारखंडमध्ये आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या पोलिसांवर पोलिसांनीच लाठीचार्ज केला आहे. पीटीआयने याबाबतचे वृत्त दिले आहे. झारखंड राज्यातील सहायक पोलीस कर्मचारी (एसपीओ) मुख्यमंत्र्यांच्या रांची येथील निवासस्थानाबाहेर आपल्या मागण्यांसाठी निदर्शने करत होते.त्यामुळे, या पोलिसांना इतर पोलिसांप्रमाणे सर्व सरकारी सेवा-सुविधा प्राप्त होत नाहीत. तसेच त्यांना वेतनही अल्प मिळते.गेल्या अनेक दिवसांपासून झारखंडमधील सहायक पोलीस कर्मचाऱ्यांकडून या मागण्या केल्या जात आहेत. पगारवाढीसह आठ मागण्या त्यांनी लावून धरल्या आहेत. मात्र, त्यांच्या कोणत्याच मागण्यांकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याने आज या पोलीसांनी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाबाहेर आंदोलन करण्याचा निर्णय घेतला.

### काय आहेत मागण्या?

मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाच्या संरक्षणासाठी लावलेले बॅरिकेड्स तोडून सुरक्षा यंत्रणा मोडण्याचा प्रयत्न केला. त्या दरम्यानच आंदोलक पोलीस आणि तैनात असलेले पोलीस यांच्यामध्ये धुमश्चक्री पहायला मिळाली. आंदोलक पोलिसांनी पोलिसांच्याच वाहनांची नासधुस केल्याचा आरोप केला जात आहे. याच दरम्यान पोलिसांनी आंदोलक पोलिसांवर लाठीचार्ज केला. या लाठीचार्जमध्ये काही जण जखमी झाले आहेत. सध्या हे आंदोलन नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत; मात्र, हे आंदोलक पोलिस रस्त्यावर ठाण मांडून बसल्याची माहिती आहे.आंदोलन करणाऱ्या पोलिसांनी मुख्यमंत्र्यांसमोर काही मागण्या ठेवल्या आहेत. आपल्याला कायमस्वरूपी नोकरी मिळावी, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.

# हिंदू नावे धारण करुन होते मांसविक्री?

## योगी सरकारने खाद्यविक्रेत्यांना ओळख उघड करण्याचे आदेश

। नवी दिल्ली ।
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज शुक्रवारी (१९ जुलै) घेतलेल्या एका निर्णयामुळे विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. उत्तर प्रदेश राज्य सरकारकडून राज्यातील कांवड यात्रेच्या मार्गावर असलेल्या सर्व भोजनालयांच्या मालकांनी आपापली नावे दर्शनी भागात लावावीत, असा आदेश देण्यात आला आहे.**



याआधी उत्तर प्रदेश पोलिसांकडून मुझफ्फरनगरमधील भोजनालयांसाठी हा आदेश लागू करण्यात आला होता. त्याविरोधात विरोधी पक्षांनी प्रचंड विरोध दर्शवल्यानंतर मुझफ्फरनगरमधील पोलिसांनी त्यांचा हा आदेश मागे घेतला आहे. त्यानंतर आता मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी कांवड यात्रेच्या मार्गावरील सर्वच भोजनालयांसाठी हा निर्णय लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार, प्रत्येक खाद्यपदार्थांचे दुकान अथवा हातगाडी चालकाला दर्शनी भागातील एका फलकावर मालकाचे नाव टाकावे लागेल. कांवड यात्रेकरुंचे पावित्र्य अबाधित ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी म्हटले आहे. या निर्णयानुसार, खानावळी, भोजनालये, रेस्टॉरंट्स, धाबे अथवा लहान-सहान खाद्यपदार्थांच्या गाड्या अशा सर्वांनाच आपली ओळख दर्शनी भागात एक फलक लावून उघड करावी लागणार आहे. याआधी उत्तर प्रदेश राज्य सरकारमधील मंत्री कपिल देव अग्रवाल यांनी असा आरोप केला.

### मोबाइल नंबर प्रदर्शित करण्याचे आदेश

मांसाहारी पदार्थांची विक्री करतात.” असा दावा त्यांनी केला होता. २२ जुलैपासून कांवड यात्रा सुरू होणार असल्याने संपूर्ण उत्तर प्रदेशमध्ये सध्या जय्यत तयारी सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर, आता उत्तराखंड पोलिसांनीही कांवड यात्रा मार्गावरील भोजनालयांना मालकांची नावे फलकावर लावण्याचे आदेश जारी केले आहेत. माध्यमांशी बोलताना हरिद्वारचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक प्रमोद सिंह दाबोल म्हणाले की, “हॉटेल, ढाबे किंवा स्ट्रीट फूड स्टॉल चालवणाऱ्या सर्वांनाच त्यांच्या आस्थापनेवर मालकाचे नाव, क्यूआर कोड आणि मोबाइल नंबर प्रदर्शित करण्याचे आदेश दिले आहेत.

# अमिताभ बच्चन यांना यंदाचा लता मंगेशकर पुरस्कार

बॉलीवूडचे महानायक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमिताभ बच्चन यांचा जलवा अजूनही कायम आहे. त्यांना ही नावं आणि प्रसिद्धी इतक्या सहजासहजी मिळाली नाहीत. प्रत्येक कलाकारांच्या वाटेला संघर्ष असतोच. तसाच बिग बींना देखील करिअरच्या सुरुवातीपासूनच खूप संघर्ष करावा लागला. या सिनेसृष्टीत त्यांना जवळपास पाच दशक पूर्ण झाली आहेत. या पाच दशकात त्यांनी अनेक हिट चित्रपट दिले आहेत. त्यामुळे सिनेसृष्टीतील बिग बींच्या या कारकीर्दीबद्दल आणि योगदानाबद्दल यंदा त्यांना लता दीनानाथ मंगेशकर पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. गेल्यावर्षी लता दीनानाथ मंगेशकर हा पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदींना प्रदान करण्यात आला होता. यंदा हा पुरस्कार अमिताभ बच्चन यांना जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्राचा मानाचा पुरस्कार सोहळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मास्टर दिनानाथ मंगेशकर स्मृती पुरस्कार सोहळ्याची आज घोषणा झाली. पंडित हृदयनाथ मंगेशकर, ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर आणि आदिनाथ मंगेशकर यांच्या उपस्थितीत पुरस्कार सोहळ्याची घोषणा करण्यात आली. दीनानाथ मंगेशकर यांच्या ८२व्या पुण्यतिथीनिमित्ताने एप्रिलला हा पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. दीनानाथ नाट्यगृह येथे हा सोहळा रंगणार आहे. या सोहळ्यात अमिताभ बच्चन यांच्यासह संगीत, नाटक, कला, वैद्यकीय, पत्रकारीता व सामाजिक कार्य क्षेत्रातील दिग्गजांचा सत्कार होणार आहे.

# सुयश शर्मा याच्याशी शाहरुखच्या गप्पा रंगल्या

बॉलीवूडचा किंग खान शाहरुख खान उत्तम अभिनेता तर आहेच पण आयपीएल सामन्यातील संघ 'कोलकाता नाइट रायडर्स'चा मालकदेखील आहे. आयपीएलच्या हंगामाला सुरूवात झाल्यापासून संपूर्ण भारतात क्रिकेटमय वातावरण झालं आहे. १४ एप्रिल रोजी रविवारी 'कोलकाता नाइट रायडर्स' विरुद्ध 'लखनऊ सुपर जायंट्स' यांचा सामना पार पडला. या सामन्यात कोलकाताने लखनऊवर ८ विकेट्सनी विजय मिळवला. या सामन्यानंतर शाहरुखने खेळाडूंची भेट घेतली.'कोलकाता नाइट रायडर्स' संघातील क्रिकेटपटू सुयश शर्मा याच्याशी शाहरुखच्या चांगल्याच गप्पा रंगल्या होत्या. फॅशन, लूक्समुळे नेहमीच चर्चेत असणाऱ्या शाहरुखला सुयशच्या हेयरस्टाईलची भुरळ पडली. याचाच व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होताना दिसतोय.शाहरुख खान क्रिकेटर सुयशला मैदानात भेटला. त्याने क्रिकेटरची गळाभेट घेतली. तेव्हा शाहरुखने क्रिकेटर सुयशची हेअरस्टाईल बघितली आणि त्याला ती प्रचंड आवडली. त्याने सुयशला विचारलं, "कोणाच्या सांगण्यावरून तू ही हेअरस्टाईल केली आहेस." यावर सुयश म्हणाला, "मी स्वत:च केली आहे."मैदानात गप्पा मारत असतानाच शाहरुखने त्याच्या मॅनेजर पूजा ददलानीला हाक मारली आणि सांगितले, "पूजा मला अशीच हेअरस्टाईल हवी आहे." यावर आजूबाजूला असलेले सगळे क्रिकेटर हसले.

# अनुष्काने दाखवली लेकाची झलक

अभिनेत्री अनुष्का शर्माने १५ फेब्रुवारी रोजी अकायला जन्म दिला. दुसऱ्या बाळाचं स्वागत करण्यासाठी जानेवारी महिन्यात विराट-अनुष्का लंडनला रवाना झाले होते. कुटुंबाला वेळ देण्यासाठी कोहलीने कसोटी सामन्यांमधून काही काळ ब्रेक घेतला होता. लेकाच्या जन्मानंतर आणि आयपीएलच्या निमित्ताने मार्च महिन्यात विराट कोहली एकटा भारतात आला. यावेळी चाहत्यांसह पापाराझींनी त्याच्याकडे अनुष्काबद्दल विचारपूस केली होती. गेल्या अनेक दिवसांपासून अभिनेत्री दोन्ही मुलांसह लवकरच भारतात परतणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. अखेर काही महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर अनुष्का शर्मा तिची दोन्ही मुलं वामिका आणि अकायबरोबर भारतात परतली आहे. यासंदर्भात 'विरल भय्यानी' या पापाराझी इन्स्टाग्राम पेजवरून माहिती देण्यात आली आहे. शिवाय अनुष्काने पापाराझींना अकायसह वामिकाची झलक दाखवल्याचा दावा सुद्धा या पोस्टमध्ये करण्यात आला आहे.विराट कोहली आणि अनुष्का शर्माने २०१७ मध्ये लग्नगाठ बांधली. यानंतर तीन वर्षांनी अनुष्काने वामिकाला जन्म दिला. लेकीचा जन्म झाल्यावर तिचे कोणीही फोटो काढू नयेत असा अनुष्काचा कायम आग्रह होता. तिची हीच अट यापुढे सुद्धा कायम राहणार आहे. पापाराझींनी दिलेल्या माहितीनुसार, अनुष्का शर्माने लेक अकायची झलक विमानतळावर पापाराझींना दाखवली. तसेच "लवकरच निवांत आणि जेव्हा माझी मुलं माझ्याबरोबर नसतील तेव्हा मी फोटोसाठी पोज देईल." असं अभिनेत्रीने सांगितलं आहे.



# क्रिती खरबंदाच्या व्हिडीओची चर्चा

बॉलीवूड कपल पुलकित सम्राट आणि क्रिती खरबंदा यांचा विवाहसोहळा १५ मार्चला थाटामाटात पार पडला. पुलकित-क्रितीने मानेसरमध्ये लग्नगाठ बांधली. पुलकित-क्रितीच्या लग्नसोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले होते. १५ एप्रिलला पुलकित-क्रितीच्या लग्नाला एक महिना पूर्ण झाला. या निमित्ताने दोघांनी आपल्या सोशल मीडियावर लग्नसोहळ्यातील काही क्षण शेअर केले आहेत. नवरीची मंडपात एंट्री होताच पुलकितचे अश्रू अनावर झाले. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होतोय. क्रिती आणि पुलकितने या खास दिवशी एकमेकांसाठी छोटसं स्पीच तयार केलं होतं. यात त्यांनी एकमेकांबद्दल खूप सुंदर गोष्टी लिहिल्या होत्या. आपल्या भावना व्यक्त करत असताना दोघांचेही डोळे पाणावले होते.सप्तपदीच्या आधी पुलकित क्रितीला भेटायला आला होता. तेव्हा "ब्राईड ओ ब्राईड" अशी हाक मारत त्याने क्रितीला बोलावलं. पुलकितच्या हाकेनंतर क्रिती बाहेर आली आणि तिने त्याला घट्ट मिठी मारली. क्रितीने याचा व्हिडीओ तिच्या अधिकृत सोशल मीडियावर शेअर केला आहे. "जेव्हा आम्ही एकमेकांना शोधलं, तेव्हा खरंतर आम्ही स्वतःला शोधलं आणि हे सर्वात सुंदर प्रकारचं प्रेम आहे. आता तर लग्नाला एक महिना झाला आहे, पण कायम आयुष्य एकत्र जगण्याची सुरुवात खूप आधीपासूनच सुरू झाली आहे."क्रितीने लग्नाचे फोटो आपल्या चाहत्यांबरोबर शेअर केले होते. लग्नासाठी क्रितीने बेबी पिंक रंगाचा लेहेंगा निवडला होता, तर पुलकितने या खास दिवसासाठी ऑलिव्ह ग्रीन रंगाची शेरवानी परिधान केली होती. पुलकितच्या शेरवानीची खासियत म्हणजे यावर संस्कृतमध्ये मंत्र लिहिलेले होते. सुंदर कॅप्शन देत क्रितीने हे लग्नाचे फोटो शेअर केले होते. क्रितीने लग्नाचे फोटो शेअर केल्यानंतर बॉलीवूड कलाविश्वातून शुभेच्छांचा वर्षाव झाला होता.दरम्यान, पुलकित व क्रितीबद्दल सांगायचं झाल्यास मागच्या काही वर्षांपासून ते एकमेकांना डेट करत होते. दोघांनी काही महिन्यांपूर्वी मार्चमध्ये लग्न करणार असल्याचे संकेत फोटो पोस्ट करून दिले होते.

# 15व्या वर्षात विद्या पडली होती प्रेमात



आपल्या अभिनय कौशल्याने प्रेक्षकांना भुरळ घालणारी अभिनेत्री विद्या बालन सध्या तिच्या आगामी चित्रपटाच्या प्रमोशनसमध्ये व्यग्र आहे. रोमँटिक कॉमेडी चित्रपट 'दो और दो प्यार' येत्या शुक्रवारी म्हणजेच १९ एप्रिलला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाद्वारे विद्या बालन पुन्हा एकदा नवी भूमिका घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी विद्या बालन आणि अभिनेता प्रतीक गांधीने इन्स्टंट बॉलीवूडला भेट दिली. नुकत्याच 'इन्स्टंट बॉलीवूड'ला दिलेल्या मुलाखतीत विद्याने आपल्या पहिल्या प्रेमाबद्दल सांगितलं. मुलाखतदाराने पहिल्यांदा प्रेमात पडल्याचा किस्सा विचारला असता विद्या म्हणाली, "मी जेव्हा पहिल्यांदा प्रेमात पडले तेव्हा मी १५ वर्षांची होते. ते फक्त आकर्षण होतं आणि प्रेम नव्हतं. पण तेव्हा मला वाटायचं की, मला माझं प्रेम मिळालं आहे. आता याच्याबरोबरच लग्न, याच्याबरोबरच आयुष्य घालवणार आणि हेच माझं नशीब आहे. नंतर काही दिवसांनी मला त्याची वेगळीच बाजू दिसली आणि मला ते आवडलं नाही, पटलं नाही, मग मी त्याचा विचार सोडून दिला."पहिल्यांदा झालेल्या हार्टब्रेकबद्दलही विद्या बालनने सांगितलं. ती म्हणाली, "मी ज्या मुलाला पहिल्यांदा डेट केलेलं त्याने माझं हार्टब्रेक केलं, कारण त्याने मला फसवलं होतं. आमचं नुकतचं ब्रेकअप झालेलं आणि व्हॅलेन्टाईन्स डेला तो मला कॉलेजमध्ये दिसला. आम्ही एकाच कॉलेजमध्ये होतो. तो मला म्हणाला की, मी माझ्या एक्स गर्लफ्रेंडबरोबर डेटला जातोय. मी यावर त्याला ओके म्हटलं. कारण तेव्हा मला खूप त्रास झाला होता. मी सांगूही शकत नाही इतकं वाईट वाटलेलं मला."चित्रपटातील विद्या बालनचा सहकलाकार प्रतीक गांधीनेही त्याच्या प्रेमाबद्दल सांगितलं. प्रतीक एकदाच प्रेमात पडला आणि दोन वर्षे मागे लागून त्याने त्याची पत्नी भामिनी ओझाशीचं लग्न केलं.दरम्यान, शीर्षा गुहा ठाकुरता दिग्दर्शित 'दो और दो प्यार' चित्रपटाबद्दल सांगायचं झालं तर, या चित्रपटात विद्या बालनसह प्रतीक गांधी, इलिआना डिक्रुझ, सेंधिल राममूर्ती यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. १९ एप्रिलला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आपल्या अभिनय कौशल्याने प्रेक्षकांना भुरळ घालणारी अभिनेत्री विद्या बालन सध्या तिच्या आगामी चित्रपटाच्या प्रमोशन्समध्ये व्यग्र आहे.

# भारताची विजयी सलामी!

## पाकिस्तानवर 7 विकेट्सनी मात, स्मृतीचे अर्धशतक हुकले

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**महिला आशिया चषक टी-२० स्पर्धेतील भारताने आपल्या पहिल्या सामन्यात पाकिस्तानचा दारुण पराभव केला. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने ७ गडी राखून विजय मिळवला. या सामन्यात पाकिस्तान संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यादरम्यान पाकिस्तानचा संघ १०८ धावांवर गडगडला. प्रत्युत्तरात स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांच्या दमदार खेळीच्या जोरावर भारताने पंधराव्या षटकात विजयाची नोंद केली. भारताकडून गोलंदाजांनीही चमकदार कामगिरी केली. दीप्ती शर्माने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या.**



महिला आशिया चषकाचा दुसरा सामना शुक्रवारी भारत आणि पाकिस्तान यांच्यात डंबुला येथील रंगिरी डंबुला आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि 19.2 षटकात 10 गडी गमावून 108 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल भारतीय संघाने 14.1 षटकांत तीन गडी गमावून 109 धावा केल्या आणि सामना सात विकेट्सने जिंकला. भारताच्या विजयात संघाच्या सलामीच्या जोडीने महत्त्वाची भूमिका बजावली. दोघींमध्ये पहिल्या विकेटसाठी 85 धावांची भागीदारी झाली. भारतीय संघाची उपकर्णधार स्मृती मानधना 31 चेंडूत 45 धावा करून बाद झाली. यादरम्यान तिने नऊ चौकार मारले. तर शेफाली वर्मा 29 चेंडूत 40 धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. यादरम्यान तिने सहा चौकार आणि एक षटकार लगावला. त्याचवेळी दयालन हेमलथा 14 धावा करून बाद झाली. या सामन्यात हरमनप्रीत कौर पाच धावा केल्यानंतर नाबाद राहिली आणि जेमिमा रॉड्रिग्स तीन धावा केल्यानंतर नाबाद राहिली. टीम इंडियाने पाकिस्तानला १०८ धावांवर ऑलआउट केले. निदा दारच्या नेतृत्वाखाली पाकिस्तान संघाकडून अमीनने सर्वाधिक 25 धावा केल्या.

तिने 35 चेंडूंचा सामना करत 3 चौकार मारत 22 धावांची खेळी केली. फातिमा सनाने 16 चेंडूंचा सामना करताना त्याने नाबाद 22 धावा केल्या. सनाने एक चौकार आणि दोन षटकार मारले. हसनने 19 चेंडूंचा सामना करत 22 धावा केल्या. तिने 3 चौकार मारले.भारतीय गोलंदाजांची या सामन्यात चमकदार कामगिरी पाहायला मिळाली. दीप्ती शर्माने 4 षटकात 20 धावा देत 3 विकेट्स घेतल्या. दीप्तीने 8 धावांच्या वैयक्तिक धावसंख्येवर पाकिस्तानचा कर्णधार निदाची विकेट घेतली. त्याचबरोबर हसन 22 धावांच्या वैयक्तिक धावांवर बाद केले. तसेच रेणुका सिंग, श्रेयंका पाटील आणि पूजा यांनी २-२ विकेट्स घेतल्या.दयालन हेमलता यांच्या रूपाने संघाला तिसरा धक्का बसला आहे. या सामन्यात तिने 11 चेंडूत 14 धावांची खेळी केली. भारतीय संघाने हा सामना जवळपास जिंकला आहे, पण जसजसे ते विजयाच्या जवळ आले, तसतसे त्यांनी विकेट गमावण्यास सुरुवात केली.

### 7 गडी राखून विजय मिळवला

महिला आशिया चषक टी-२० स्पर्धेतील भारताने आपल्या पहिल्या सामन्यात पाकिस्तानचा दारुण पराभव केला. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने ७ गडी राखून विजय मिळवला. या सामन्यात पाकिस्तान संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रत्युत्तरात स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांच्या दमदार खेळीच्या जोरावर भारताने पंधराव्या षटकात विजयाची नोंद केली. भारताकडून गोलंदाजांनीही चमकदार कामगिरी केली. दीप्ती शर्माने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या.महिला आशिया चषकाचा दुसरा सामना शुक्रवारी भारत आणि पाकिस्तान यांच्यात डंबुला येथील रंगिरी डंबुला आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि 19.2 षटकात 10 गडी गमावून 108 धावा केल्या.

# टीम इंडियाच्या निवडीवर शशी थरूर संतापले

## अभिषेक शर्मांची निवड न झाल्याने चाहते संतापले

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**श्रीलंकेविरुद्धच्या तीन टी-२० आणि तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी टीम इंडियाची निवड करण्यात आली आहे. यष्टिरक्षक फलंदाज संजू सॅमसन आणि स्फोटक सलामीवीर अभिषेक शर्मा यांची वनडे संघात निवड न झाल्याने क्रिकेट चाहते प्रचंड संतापले आहेत. सॅमसनने गेल्या वर्षी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शतक झळकावले होते. त्यानंतर त्याची वनडेत निवड झाली नाही. दुसरीकडे, झिम्बाब्वे दौऱ्यावर अभिषेकने शानदार शतक झळकावले. असे असूनही त्याला संघात स्थान मिळवता आले**



संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांची निवड न केल्यामुळे काँग्रेस नेते आणि लोकसभा खासदार शशी थरूर यांनी बीसीसीआयवर संताप व्यक्त केला आहे. त्यांनी संघ निवडीवर टीका केली आहे. झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेत अभिषेकने आपल्या निडर फलंदाजीने सर्वांना प्रभावित केले होते. पंजाबच्या या फलंदाजाने आपल्या दुसऱ्या सामन्यात शतक झळकावले होते, पण नंतर यशस्वी जैस्वाल संघात आल्यावर तो तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करु लागला.सॅमसन आणि अभिषेक या दोघांनाही एकदिवसीय आणि टी-२० संघात स्थान मिळण्याची अपेक्षा होती, परंतु आश्चर्यकारकपणे त्यांना वगळण्यात आले. सॅमसनला टी-२० संघात निश्चितच स्थान मिळाले. शशी थरूर यांनी एक्सवर आपले मत मांडताना आणि निवड मनोरंजक असल्याचे वर्णन केले. काँग्रेस खासदाराने असेही म्हटले की, भारतात क्वचितच यशाचा रंग निवडकर्त्यांसाठी इतका महत्त्वाचा असतो."या महिन्याच्या अखेरीस श्रीलंका दौऱ्यासाठी भारतीय संघाची निवड मनोरंजक आहे. आपल्या शेवटच्या एकदिवसीय सामन्यात शतक झळकावणाऱ्या संजू सॅमसनची वनडे संघात निवड झालेली नाही.

### बीसीसीआयवर व्यक्त केला संताप

त्याचवेळी भारत विरुद्ध झिम्बाब्वे मालिकेत टी-२० शतक झळकावणाऱ्या अभिषेक शर्माची कोणत्याच संघात निवड झालेली नाही. त्यामुळे क्वचितच भारताच्या जर्सीतील यशाचा रंग निवडकर्त्यांसाठी इतका महत्त्वाचा असेल. तरीही संघाला शुभेच्छा."श्रीलंकेविरुद्धच्या तीन टी-२० आणि तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी टीम इंडियाची निवड करण्यात आली आहे. यष्टिरक्षक फलंदाज संजू सॅमसन आणि स्फोटक सलामीवीर अभिषेक शर्मा यांची वनडे संघात निवड न झाल्याने क्रिकेट चाहते प्रचंड संतापले आहेत. सॅमसनने गेल्या वर्षी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शतक झळकावले होते. त्यानंतर त्याची वनडेत निवड झाली नाही. दुसरीकडे, झिम्बाब्वे दौऱ्यावर अभिषेकने शानदार शतक झळकावले. असे असूनही त्याला संघात स्थान मिळवता आले संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांची निवड न केल्यामुळे काँग्रेस नेते आणि लोकसभा खासदार शशी थरूर यांनी बीसीसीआयवर संताप व्यक्त केला आहे. त्यांनी संघ निवडीवर टीका केली आहे.